बाप्पा मोरया...

मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दिनांक २५ सप्टेंबर २०२३। पान १

# शहराच्या सुरक्षेसाठी ५ हजार सीसीटीव्ही कॅमेरे!

## आयुक्त शेखर सिंह यांनी घेतला विविध प्रकल्पांचा आढावा

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांची सुरक्षा, गुन्हेगारी आणि वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी आणि महापालिकेच्या वतीने शहरामध्ये विविध ठिकाणी सुमारे ५ हजारहून अधिक कॅमेरे लावण्यात आले आहेत. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा पोलीस प्रशासनाला मोठ्या प्रमाणात फायदा होत असून गुन्ह्यांचा छडा लावण्यात यश येत आहे. वाहतुकीचे उल्लंघन करणा-या वाहनचालकांवर देखील याचा वचक बसून वाहतुक व्यवस्था सूरळीत ठेवण्यात मदत होणार असल्याची माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली. तसेच, बीआरटी मार्गात नियमबाह्य



वाहने चालविणा-यांवर देखील बंदी घालण्यासाठी १० बीआरटी मार्गांवर लेन व्हायलेशन डिटेक्शन कॅमेरे बसविण्यात आले आहे. तसेच, सीसीटीव्हीच्या माध्यमातून पोलिसांना ३५० हून अधिक गुन्हांचा तपास लावण्यात मदत झाल्याचेही त्यांनी सांगितले. निगडी येथील आयसीसीसी सेंटर येथे दि.२२ रोजी आयुक्त शेखर सिंह यांनी स्मार्ट सिटीमार्फत सूरू असलेल्या विविध प्रकल्पांचा आढावा घेतला. तसेच, प्रकल्पांबाबत माहिती घेवून केंद्र शासनाने आखून दिलेल्या तारखेपर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या. यावेळी, शहर अभियंता मकरंद निकम, सह मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, सह शहर अभियंता मनोज सेठीया, बाबासाहेब गलबले, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे यांच्यासह प्रकल्प सल्लागार तसेच ठेकेदार कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी आदी उपस्थित होते. पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी मार्फत सूरू असलेले अनेक प्रकल्प पूर्ण झाले आहेत. तर काही प्रकल्प प्रगतीपथावर आहेत. ही सर्व विकास प्रकल्प शहराच्या नाव लौकिकात भर घालणारी नक्कीच ठरतील. मात्र, विकास प्रकल्प सूरू असताना अनेक समस्यांचा सामना प्रशासनाला करावा लागतो. त्यामुळे विकासात बाधा निर्माण होते. अशा समस्या निर्माण करणा-या मानसिकतांना वेळीच आवर घाला, असे सांगून विकासात आळा घालणा-यावर पोलीसात गुन्हे दाखल करा, अशा सूचना देखील त्यांनी अधिकार-यांना यावेळी दिल्या. दरम्यान, वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन थांबविण्यासाठी व्हिडिओ आधारित गती उल्लंघन शोध प्रणालीची माहिती आयुक्त सिंह यांनी जाणून घेतली.

### नंबर प्लेट ओळखणार कॅमेरा

» एएनपीआर कॅमेरा हा नंबर प्लेट ओळखणारा कॅमेरा आहे. या कॅमेऱ्याचे वैशिष्ट्य म्हणजे तो वाहनांच्या नंबर प्लेट वाचून आपोआप चलन काढणे. एवढेच नाही तर कमांड कंट्रोल रूममध्ये बसलेले पोलीस या कॅमेऱ्याच्या मदतीने रस्त्यावर लक्ष ठेवून नियम मोडणाऱ्यांना चलन देऊ शकतात. एएनपीआर कॅमेरा गुन्हेगारांची छायाचित्रे घेतो आणि त्यात बसवलेल्या सॉफ्टवेअरच्या मदतीने गुन्हेगारांचे तपशील जवळपास तैनात असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना पाठवतो. याव्यतिरिक्त, अछ्झठ कॅमेरे ॲक्सेस कंट्रोल सिस्टम स्वयंचलित करू शकतात. सुरक्षा प्रदान करू शकतात, कार चोरीला प्रतिबंध करू शकतात, विमा नसलेली वाहने शोधणे आणि वाहनांचे निरीक्षण, बेकायदेशीर पार्किंग तसेच वाहतूक व्यवस्थापन सुव्यवस्थित करू शकतात.

# संघटना बळकटीसाठी जोमाने कामाला लागा!

## काम करताना सर्वांनी एकमेकांशी संवाद साधा : भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शहरामध्ये मोठ्या संख्येने नागरिक भाजपाचे समर्थन करीत आहेत. नागरिकांची कामे कुठे अडणार नाहीत, याची काळजी घ्यायला हवी. भुतकाळातील गोष्टी विसरून नव्या विचारांसह पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सर्वांचा सन्मान राखून संघटना बळकटीसाठी जोमाने कामाला लागणे आवश्यक आहे, असा मोलाचा सल्ला भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी नवनिर्वाचित पदाधिकारी व सदस्यांना दिला. भारतीय जनता पार्टीची शहर



(जिल्हा) कार्यकारणी जाहीर झाल्यानंतर शहराध्यक्ष शंकरभाऊ जगताप यांच्या अध्यक्षतेखाली पहिली जिल्हा कार्यकारिणी बैठक काल (दि.२३) रोजी मोरवाडी येथील भाजप पक्ष कार्यालयात पार पडली. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना शंकर जगताप बोलत होते. शहरातील कार्यकत्यांना न्याय देण्याचे काम संघटनेच्या माध्यमातून करण्यात आले आहे. संघटनेत काम करताना सर्वांनी एकमेकांशी संवाद साधा. स्वर्गिय आमदार लक्ष्मण भाऊ जगताप यांच्या विचारांना पुढे नेण्यासाठी सर्वांचे प्रयत्न महत्वाचे आहे, असेही ते म्हणाले. यावेळी, भाजपाच्या पिंपरी चिंचवड शहर प्रभारी वर्षाताई दहाळे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, वरिष्ठ उपाध्यक्ष व प्रवक्ते राजू दुर्गे, पिंपरी विधानसभा निवडणुक प्रमुख अमित गोरखे, सरचिटणीस नामदेव ढाके, माऊली थोरात, शितल शिंदे, संजय मंगोडेकर, शैलाताई मोळक, प्रदेश युवा मोर्चा सरचिटणीस अनुप मोरे, युवा मोर्चा अध्यक्ष तुषार हिंगे, ओबीसी मोर्चा अध्यक्ष राजेंद्र राजापुरे यांच्यासह विविध सेलचे अध्यक्ष व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

### नवनियुक्त शहर कार्यकारणीचे स्वागत

» नवनियुक्त भाजपा शहर कार्यकारणीचे स्वागत करुन अभिनंदन करण्यात आले. त्याचबरोबर, मावळ लोकसभा संयोजकपदी माजी शहराध्यक्ष सदाशिव खाडे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सर्वानुमते अभिनंदनाचा ठराव पारीत झाला. तसेच, शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली शहर कार्यालय येथे नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सूचना पेटी लावण्याबाबत ठराव मांडून त्याबाबत उपस्थितांना सूचना देण्यात आल्या.

# करसंवादातून १०० नागरिकांच्या शंकांचे निरसन!

## करसंवादामध्ये नागरिकांनी ऑनलाइन ऑफलाइन पद्धतीने घेतला सहभाग

**पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पालिकेच्या करआकारणी व करसंकलन विभागाच्या शनिवारी झालेल्या करसंवादामध्ये नागरिकांनी ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने सहभाग घेतला. मालमत्ताकरावरील सवलती, ‘मालमत्ता सर्वेक्षण अभियान’, युपिक आयडी (युनिक प्रॉपर्टी आयडेंटिफिकेशन कोड) आणि मालमत्ताकरविषयक शंकांचे निरसन सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांच्यामार्फत करण्यात आले. नागरिक आणि अधिकाऱ्यांमध्ये थेट संवाद असा उद्देश ठेवून करसंवाद घेण्यात येतो.




नागरिकांनी विचारलेल्या प्रश्नांबाबत विभागाकडून तत्काळ माहिती पुरविली. त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे आदेशही देण्यात आले. करसंवादामध्ये शंभरहून अधिक नागरिकांनी सहभाग नोंदविला. चालू आर्थिक वर्षात तीन लाख मालमत्ताधारकांनी आत्तापर्यंत ५७० कोटींचा कर महापालिका तिजोरीत जमा केला आहे. सप्टेंबरअखेर ऑनलाइन स्वरूपात मालमत्ताकर भरल्यास सामान्यकरामध्ये चार टक्के, नवीन आकारणी झालेल्या मालमत्ताधारकांनी तीन महिन्यांमध्ये आगाऊ कराचा भरणा केल्यास सामान्य करामध्ये १० टक्क्यांच्या सवलतीचा लाभ घेण्याचे आवाहनही करसंवादामधून करण्यात आले. महापालिका हद्दीमध्ये सहा लाख नोंदणीकृत मालमत्ता आहेत.

### महिलांना रोजगार

**» सप्टेंबरअखेर ऑनलाइन स्वरूपात मालमत्ताकर भरल्यास सामान्यकरामध्ये चार टक्के, नवीन आकारणी झालेल्या मालमत्ताधारकांनी तीन महिन्यांमध्ये आगाऊ कराचा भरणा केल्यास सामान्य करामध्ये १० टक्क्यांच्या सवलतीचा लाभ घेण्याचे आवाहनही करसंवादामधून करण्यात आले. करसंकलन विभागाने मालमत्ताकर देयके वितरणाचे काम महिला बचत गटांना दिले होते. त्यांच्या माध्यमातून शंभर टक्के देयकांचे वाटप करण्यात आले. त्याच धर्तीवर ‘मालमत्ता सर्वेक्षण नोंदणी’ अभियानासाठी माहिती संकलित करण्याचे काम बचत गटांच्या महिलांना देण्यात आले असून, यातून त्यांना रोजगार मिळणार आहे**

उत्पन्नवाढीच्या दृष्टीने ‘मालमत्ता सर्वेक्षण अभियान’ सुरू करण्यात येणार असून, याद्वारे मालमत्तांची संपूर्ण माहिती जमा केली जाणार आहे. या अभियानामार्फत अत्याधुनिक नकाशे प्रणालीद्वारे गटाची निर्मिती करून मालमत्तांना विशिष्ट मालमत्ता क्रमांक देण्यात येणार आहे. त्याबाबतच्या मालमत्ताधारकांच्या सर्व शंकांचे निरसन करण्यात आले.

# वाकड- थेरगाव गणेशोत्सवात ऐतिहासिक देखाव्यांवर भर!

## मंदिरांच्या प्रतिकृती, विद्युत रोषणाई अन् फुलांची सजावट देखाव्याचे विशेष आकर्षण

**पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

वाकड परिसरात अनेक प्रमुख मंडळांनी आपली परंपरा कायम राखत, यंदाही देशातील प्रमुख मंदिरांच्या प्रतिकृती साकारल्या आहेत तर अनेक मंडळांनी आकर्षक विद्युत रोषणाई व फुलांच्या सजावटीसह मनोरंजनात्मक आणि सामाजिक उपक्रम राबविले आहेत. वाकड दत्त मंदिर रस्त्यावरील नवनाथ तरुण मंडळाने भव्य एलईडी दिव्यांमध्ये गरुड महाल साकारला आहे. मंडळ यंदा ४९ व्या वर्षाचे झाले. वाकडचा राजा अशी ख्याती असलेल्या न्यू दत्त नगर वाकड येथील श्री गणेश प्रतिष्ठान श्री गणेश मित्र मंडळाने अयोध्येतील राम मंदिराची भव्य प्रतिकृती उभारली आहे. हे ६० फूट उंच व ५० फूट रुंद आहे. अध्यक्ष किरण कळमकर आहेत. सामाजिक कामात अग्रेसर असलेल्या उत्कर्ष मित्र मंडळाने यंदा




३३ वर्षी ऐतिहासिक केसरी वाड्यातील पौराणिक सभामंडप साकारला आहे. श्रीनिवास कलाटे अध्यक्ष आहेत. कावेरीनगर पोलिस युवक मित्र मंडळाने यंदा ३० व्या वर्षात पदार्पण केले आहे. मंडळाने भव्य महायोगी महाकाल महादेवाची प्रतिकृती साकारून आकर्षक सजावट केली आहे. वाकड परिसरातील जुने व नावाजलेले मंडळ आहे. निखिल कदम हे अध्यक्ष आहेत. महाप्रसाद सोहळा व भव्य विसर्जन मिरवणूक हे मंडळाचे विशेष आहे. मानकर वस्ती येथील अजित मित्र मंडळाने ‘सूर्य रथ’ साकारला आहे. रथात गणेश मूर्ती विराजमान केलेली आहे. यंदा मंडळाचे ४३ वे वर्ष असून, मंडळाचे अध्यक्ष सोमनाथ मानकर आहेत. भुजबळ वस्ती येथील दर्यावर्दी क्रीडा मंडळाने ४५ व्या वर्षात पदार्पण केले आहे. सामाजिक बांधिलकी जपत गणेशोत्सव साजरा केला जात आहे. संतोष भुजबळ अध्यक्ष आहेत. विनोदेनगर वाकड येथील नवयुग मित्र मंडळाचे हे ३८ वे वर्ष आहे. गणपतीची पहिली आरती महिलांच्या हस्ते करून सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. मानकर चौक वाकड येथील स्टार मित्र मंडळाने ४० व्या वर्षात पदार्पण केले आहे. फुलांची आरास व विद्युत रोषणाई केली आहे. कैलास कस्पटे अध्यक्ष आहेत. वाकडकर वस्ती येथील श्री गणेश युवा मंच ४४ वर्ष साजरे करत आहे. मंडळ अनावश्यक खर्चाला बगल देत दरवर्षी सामाजिक उपक्रमावर भर देते. यंदा मयूर रथात भव्य श्री विराजित झाले आहेत. तर भव्य मिरवणूक,

### मोबाईल शाप की वरदान

**» वाकड परिसरात अनेक प्रमुख मंडळांनी आपली परंपरा कायम राखत, यंदाही देशातील प्रमुख मंदिरांच्या प्रतिकृती साकारल्या आहेत मंगलनगर, थेरगाव येथील सुवर्णदिप मित्र मंडळाने फुलांची आरास केली आहे. अध्यक्ष बबलू जोगदंड आहेत. सम्राट मित्र मंडळाने ४२ व्या वर्षात पदार्पण करत आहे. यंदाच्या वर्षी मंडळाने सोशल मीडिया व मोबाईल शाप की वरदान हा जिवंत देखावा सादर केलेला आहे. आग्र्यावरून छत्रपती शिवाजी महाराजांच्या सुटकेचा थरार दाखवणारा देखावा**

सामाजिक चित्रपट, मुले व महिलांसाठी विविध स्पर्धा, खेळ पैठणीचा, जादूचा खेळ, रांगोळी स्पर्धा आदी उपक्रमांचे आयोजन केले आहे. नंदकुमार वाकडकर अध्यक्ष आहेत. संतोषनगर थेरगाव येथील श्रीमंत छत्रपती शिवाजी तरुण मित्र मंडळाने जिवंत देखाव्याची परंपरा यंदाही जपली आहे. मंडळाने ४३ व्या वर्षात पदार्पण केले आहे. मंडळाने यावेळी आग्र्यावरून छत्रपती शिवाजी महाराजांच्या सुटकेचा थरार दाखवणारा देखावा सादर केला आहे. देखाव्यासाठी भव्य-दिव्य तीन मजली सेट उभारण्यात आला आहे. पन्नास बाय चाळीस अशा दिमाखदार रंगमंचावर आग्रा येथील किल्ल्याची प्रतिकृती उभी करून, तीसहून अधिक कलाकारांच्या माध्यमातून महाराजांच्या सुटकेचा थरार दाखवला आहे. सचिन बारणे मंडळाचे अध्यक्ष आहेत.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांची झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाला भेट!

## शहराच्या वैभवात भर पडेल असे काम करा : अजित पवार

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण निगडी येथील शरदनगर आणि दुर्गानगरच्या ६७० झोपडीधारक सभासदांच्या पुनर्वसन प्रकल्पाला भेट दिली. प्रकल्पाची माहिती घेत शहराच्या सौंदर्यात आणि वैभवात भर घालणारे काम अधिकाऱ्यांनी करावे अशी अपेक्षा अजित पवार यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, पोलीस आयुक्त विनय चौबे, सुनील नहार आदी उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री पवार यांनी सदनिकातील सुविधा, सौर ऊर्जेची व्यवस्था, इमारतीची सुरक्षा, देखभाल आणि स्वच्छता, परिसरातील वृक्षारोपण, जलपुनर्भरण आदीविषयी माहिती घेतली. इमारतीच्या परिसरात स्वच्छता राखावी, प्रकल्पातील विविध सेवांसाठी स्थानिकांना संधी द्यावी अशा सूचना देखील त्यांनी केल्या. पवार यांच्या हस्ते प्रतिनिधिक स्वरूपात याप्रसंगी दोन झोपडी धारकांना सदनिकांचे हस्तांतरण करण्यात आले. इमारतीत चांगल्या सुविधा देण्यात आल्या असून त्या नीटपणे वापराव्यात. घरासोबत इमारतही स्वच्छ व सुंदर राहील असा सर्वांनी प्रयत्न करावा, असे त्यांनी लाभार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले. मेट्रो सुविधा निगडीपर्यंत आणण्यासाठी प्रयत्नशील असल्याचेही उपमुख्यमंत्री म्हणाले. महानगरपालिका आयुक्त सिंह यांनी प्रकल्पाविषयी माहिती दिली.

### श्री मोरया गोसावी समाधी मंदिराला भेट

» उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण निगडी येथील शरदनगर आणि दुर्गानगरच्या ६७० झोपडीधारक सभासदांच्या पुनर्वसन प्रकल्पाला भेट दिली उपमुख्यमंत्री पवार यांनी श्री मोरया गोसावी समाधी मंदिराला भेट देऊन समाधीचे दर्शन घेतले आणि श्री गणेशाची आरती केली. त्यांनी पिंपरी चिंचवड येथील विविध गणेश मंडळांना भेट देऊन गणपतीचे दर्शन घेतले.

# पर्यावरण पूरक विसर्जन व मूर्तीदानाला सकारात्मक प्रतिसाद!

## माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे यांच्या पुढाकाराने कृत्रिम हौदाची सुविधा

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पुणे महापालिकेच्या प्रभाग क्रमांक मधील नागपुर चाळ येथे गणेश विसर्जनासाठी कृत्रिम हौदाची सुविधा देण्यात आली आहे. माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे यांच्या पुढाकाराने सुरू केलेल्या या उपक्रमाला प्रभागातील नागरिकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा व्हावा, या उद्देशाने दरवर्षी ही सुविधा दिली जाते. यामुळे नागरिकांची विसर्जनाची गैरसोय देखील टळत असून गणेश भक्तांना जवळच विसर्जनाची सुविधा मिळत आहे. पर्यावरण पूरक गणेशोत्सव, पर्यावरण पूरक गणपती विसर्जन आणि मूर्तीदानाबाबत शासकीय स्तरावरून सातत्याने आवाहन केले जात आहे. प्रशासनाच्या या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत डॉ. सिद्धार्थ




### अधिकार्यांकडून व्यवस्थेची पाहणी

» महापालिका प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन डॉ. धेंडे यांनी सुरू केलेल्या या उपक्रमाला अधिकार्यांकडून देखील सहकार्य मिळत आहे. यंदाच्या वर्षी या उपक्रमाला उपायुक्त किशोरी शिंदे, सहाय्यक आयुक्त करचे, नागटीळक, आरोग्य निरीक्षक स्वप्निल कुताळ यांच्यासह महापालिका कर्मचार्यांनी पाहणी केली. लुंबिनी उद्यान गणपती विसर्जन हौद व येरवडा पोस्ट कार्यालय आदी ठिकाणी पाहणी करत त्रुटी व अर्धवट राहिलेली कामे पूर्ण करून घेण्याच्या सूचना दिल्या.

> “महापालिका प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत गेल्या सात वर्षांपासून प्रभागात कृत्रिम हौदाची सुविधा देत आहे. गणेश भक्तांकडूनही त्याला उत्स्फू र्त प्रतिसाद मिळत आहे. दरवर्षी सुमारे दीड हजार गणेश मुर्तीचे संकलन होत आहे. त्या आम्ही महापालिका प्रशासनाकडे विसर्जनासाठी देत आहे.
>
> - डॉ. सिद्धार्थ धेंडे, माजी उपमहापौर, पुणे पालिका

धेंडे यांनी आपल्या प्रभागात दरवर्षी कृत्रिम हौदाची सुविधा गणेश भक्तांसाठी सुरू केली आहे. गेल्या वर्षांपासून हा उपक्रम आयोजित केला जात आहे. प्रभाग क्रमांक दोन मधील महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, लुंबिनी उद्यान व येरवडा पोस्ट कार्यालयाजवळ ही सुविधा दिली आहे. या उपक्रमाला प्रभागातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. दरवर्षी सुमारे दीड हजार गणेश मुर्तीचे संकलन देखील होत आहे. पुणे महापालिकेच्या अधिकार्यांकडे गणेश मुर्ती देऊन विसर्जनाची व्यवस्था केली जात आहे.

# शहरात पाचव्या दिवशी सुमारे ९५ हजार गणपती मूर्तींचे विसर्जन!

## जातीनिहाय जनगणना करण्याची मागणी



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** गणेशोत्सवाच्या पाचव्या दिवशी भर पावसात नागरिकांनी विसर्जनासाठी घाटांवर गर्दी झाली होती. पाच दिवसांच्या गणपती विसर्जनाच्या दिवशी सुमारे ९५ हजार मूर्तींचे विसर्जन झाले. त्यामध्ये १३ हजार मूर्तींचे संकलन ही करण्यात आले. तसेच विसर्जनावेळी सुमारे सव्वा लाख किलो इतके मोठ्या प्रमाणात निर्माल्य देखील जमा करण्यात आले. गणेशोत्सवाच्या पाचव्या दिवशी दुपारपर्यंत अनेक नागरिकांनी घराजवळील हौदामध्ये किंवा नदीपात्रातील हौदामध्ये गणपतीचे विसर्जन केले. मात्र दुपारनंतर मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू झाल्याने नागरिकांची तारांबळ उडाली होती. तरीही काही नागरिकांनी भर पावसात देखील मूर्तींचे विसर्जन करण्यास प्राधान्य दिले होते. दरम्यान, सायंकाळी पाऊस कमी झाल्यानंतर नागरिकांनी मोठ्या संख्येने घराबाहेर पडत मूर्तींचे विसर्जन केले. महापालिकेच्या वतीने विसर्जनासाठी ठिकठिकाणी बांधलेल्या हौदांसह, लोखंडी टाक्या, काही प्रमाणात फिरत्या हौदांची व्यवस्था करण्यात आली होती. त्यानुसार, शनिवारी शहराच्या वेगवेगळ्या भागात सुमारे ९५ हजार ४१ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. त्यामध्ये बांधलेल्या हौदांमध्ये १७ हजार ६६२, लोखंडी टाक्यांमध्ये ५९ हजार ३००, फिरत्या हौदांमध्ये ४ हजार २८७ इतक्या मूर्तींचे विसर्जन झाले. तर १३ हजार ७९२ मूर्ती संकलित करण्यात आल्या आहेत. अशा एकूण ९५ हजार ४१ मूर्तींचे भाविकांकडून विसर्जन करण्यात आले. दरम्यान, दरवर्षी पाच दिवसांच्या गणपती विसर्जनाच्यावेळी मोठ्या प्रमाणात निर्माल्य गोळा होते. त्यानुसार, यंदा देखील पाचव्या दिवशी सुमारे १ लाख १९ हजार ९७२ किलो निर्माल्य गोळा करण्यात आले. तर आत्तापर्यंत १ लाख ३५ हजार ११२ किलो निर्माल्य महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी गोळा केले आहे. विसर्जनाच्यावेळी जमा होणाऱ्या निर्माल्यावर प्रक्रिया करून महापालिका त्यापासून खतनिर्मिती करते.

### मूर्ती संकलनाला चांगला प्रतिसाद

» नागरिकांकडून मूर्ती विसर्जन करण्याऐवजी मूर्ती दान करण्यास प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे महापालिकेकडून विसर्जनाच्या ठिकाणी घाटांवर मूर्ती संकलन करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात येते. पाचव्या दिवशी १३ हजार ७९२ मूर्ती संकलित करण्यात आल्या असून गणेशोत्सव काळात आत्तापर्यंत १५ हजार ५५७ इतक्या मूर्ती महापालिकेकडून संकलित करण्यात आल्या आहेत.

# येरवडा तुरुंगात जन्मठेपेच्या कैद्याचा मनीऑर्डर घोटाळा!

## अधिकाऱ्यांच्या हुबेहूब सह्या करून कैद्याने लाटले २६ लाख रुपये

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** येरवडा मध्यवर्ती कारागृहात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या सचिन रघुनाथ फुलसुंदर या कैद्याने तुरुंग अधिकाऱ्यांच्या हुबेहूब बनावट सह्या आणि मनीऑर्डर रजिस्टरमध्ये खोटे दिनांक, हिशेब लिहीत २६ लाख ६९ हजार रुपये हडपल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

सचिन फुलसुंदर हा कैदी सन २००६ मधील बलात्कार व खुनाचा प्रयत्न गुन्ह्यातील आरोपी असून फेब्रुवारी २०२१ ते ऑगस्ट २०२३ यादरम्यान त्याने कारागृहातील अधिकारी व कर्मचारी यांची नजर चुकवून कारखाना विभागात होणाऱ्या वस्तू बाहेर पाठवण्याच्या मदतीचा बहाणा केला. या विभागात वारंवार येऊन त्याने तेथील अधिकारी व कर्मचारी यांचा विश्वास संपादन केला. येरवडा कारागृह येथील कैद्यांना त्यांच्या नातेवाइकांनी केलेल्या मनीऑर्डरची नोंद ठेवल्या जाणाऱ्या २ ए रजिस्टरमध्ये क्रमांक एक ते सहामध्ये त्याने फेरफार केला. कारागृह अधिकाऱ्यांच्या हुबेहूब खोट्या सह्या, दिनांक, खोटे हिशेब तयार करून किरकोळ रकमा स्वत:चे व इतर कैद्यांचे नावे दाखवल्या आणि सदर रक्कम परस्पर वापरून एकूण अंदाजे २६ लाख ६९ हजार ९११ रुपयांचा अपहार केला. सचिन फुलसुंदर हा १४ वर्षापासून कारागृहात बंदीस्त असल्याने तो कामानिमित्त मेनगेटवर येत असल्याने मेनगेटमधील कर्मचारी त्यास अडवत नसे. या संधीचा फायदा घेऊन व कर्मचाऱ्यांचा विश्वास संपादन करून शिक्षाबंदी फुलसुंदर हा




न्याय विभागात येऊन संबंधीत अधिकारी, कर्मचारी यांच्या ताब्यात असलेले २ ए रजिस्टर हाताळत असे. कर्मचाऱ्यांची नजर चुकवून अधिकारी ज्याप्रमाणे बंदी यांच्या नातेवाईकांनी पाठविलेल्या मनिऑर्डरच्या रजिस्ट्रमध्ये नोंदी घेतात, त्याप्रमाणे तो हुबेहुब खोटी दिनांक, खोटी स्वाक्षरी व खोटी रक्कम नोंद करत असे तसेच खोटे हिशोब तयार करायचा. अनेक वेळा तो सर्कल क्रमांक-१०३ येथे २ ए रजिस्टर घेऊन जाऊन तेथे खोटी दिनांक, खोटी स्वाक्षरी, व रक्कमा नोंद करुन परत रजिस्टर न्यायविभागात आणून ठेवत होता. सचिन रघुनाथ फुलसुंदर हा नारायणगांव पोलीस स्टेशन येथील बलात्कार गुन्ह्यातील आरोपी आहे. तो सन २००६ पासून कारागृहात दाखल असून त्यास काम वाटप कमिटीने कारखाना विभाग येथे साफसफाईचे काम दिले होते. त्यानुसार शिक्षाबंदी फुलसुंदर हा साफसफाईचे काम करत असताना शिक्षा बंदींचे खाजगी रक्कमेचे २ ए रजिस्टर मध्ये खोट्या मनिऑर्डर फेरफार करत असल्याचे गोपनीय माहिती कारागृह प्रशासनास मिळाली होती. याबाबत येरवडा कारागृह तुरुंगाधिकरी बापुराव भिमराव मोटे यांनी सचिन फुलसुंदर विरोधात पोलिसांकडे फिर्याद दाखल केली आहे.

### आता ऑनलाइन मनीऑर्डर

» या प्रकरणानंतर येरवडा कारागृह प्रशासन खडबडून जागे झाले आहे. यापुढे मनीऑर्डरची सगळी हस्तलिखित कामे बंद करून 'ई-प्रिझन' सॉफ्टवेअरच्या साहाय्याने कामे करण्याचे आदेश पोलिस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक अमिताभ गुप्ता यांनी दिले आहेत. त्यामुळे यापुढील कारागृहातील सर्व मनीऑर्डरची कामे ऑनलाइन स्वरूपात होणार आहे. ई-प्रिझनच्या माध्यमातून यापुढे मनीऑर्डरचे सर्व व्यवहार करण्यात येतील. त्यामुळे भविष्यात अशा प्रकारचे गैरप्रकार रोखले जातील, असे मत येरवडा कारागृह अधीक्षक सुनील ढमाळ यांनी व्यक्त केले आहे.